महाराष्ट्र शासन

**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**

१५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक - २५ ऑगस्ट, २०२०

**(मंत्रालयीन उपसचिव/सहसचिव संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-याची कंत्राटी/करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात )**

पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, या विभागामध्ये सेवाविषयक कामे, न्यायलयीन कामकाज या विवक्षित कामासाठी मंत्रालयीन सेवानिवृत्त उपसचिव/सहसचिव संवर्गातील एका अधिका-याची करार/ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे . सदर् पदांसाठी अर्हता व पात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

**नियुक्तीबाबत अटी व शर्ती :-**

१) कंत्राटी तत्वावरील पद हे शासन सेवेतील नियमित पद नाही.

२) अर्जदार शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून उपसचिव/सहसचिव म्हणून निवृत्त झालेला असावा.महसूल व वन विभाग, नगर विकास विभाग, पर्यावरण विभाग यामधून निवृत्त झालेल्या उमेदवारास प्राधान्य राहील.

३) अर्जदाराचे वय दिनांक १ ऑक्टोबर, २०२० रोजी ६५ वर्षे पेक्षा जास्त नसावे.

४) उपरोक्त कामांसाठी लागणारी विशेष अर्हता मुलाखतीद्वारे तपासण्यात येईल.

५) इंग्रजीचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

६)अर्जदार शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

७) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्याही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

८) अर्जामध्ये अर्जदाराने त्याची वैयक्तिक माहिती पुरवावी. (शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता पुराव्यासह , पासपोर्ट साईज ३ फोटो,व अनुषंगिक माहिती)

९) या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

१०) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झालेल्या उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास मा.प्रधान सचिव(पर्यावरण)यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्वसुचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

११) निवड करण्यात आलेल्या अधिका-यांस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर,२०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहील.

१२) उपरोक्त शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ मधील नमुद सर्व अटी व शर्ती सदर नियुक्तीस लागू राहतील.

१३) वर नमुद केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेल्या व अटी पूर्ण करणा-या इच्छुक व्यक्तींनी पदासाठी आपले अर्ज अवर सचिव, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, १८ वा मजला, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात दिनांक ३० सप्टेंबर, २०२० सायंकाळी ४.३० वाजेपर्यत पाठवावेत. प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर अर्जदारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(सु.कि. निकम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन